






# हस्तकलांचा

## उत्सव







संपादन
श्रुती जातेगावकर



ज्ञान प्रबोधिनीच्या छात्र प्रबोधन या मासिकाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आजपर्यंत छात्र प्रबोधन मासिकामध्ये छापून आलेल्या निवडक कलाकृतींची तीन पुस्तके प्रकाशित झाली होती, त्यापैकी हे एक! (इ.स. २०१७)

इ. स. २०१७ नंतर छात्र प्रबोधन अंकात छापून आलेल्या काही निवडक कलाकृतींची भर घालून ही दुसरी आवृत्ती प्रकाशित करीत आहोत. या पुस्तकाच्या आधारे आपण ६५ कलाकृती बनवू शकतो. कमीतकमी साहित्य तसेच त्याच साहित्यातून निरनिराळ्या सुंदर कलाकृती हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य!

या कलाकृती बनवताना एकाग्रता, कुशलता, अचूकता, संयम, चिकाटी, सुबकता, सौंदर्यदृष्टी इत्यादी अनेक गुणांचा कस लागतो. एकातून अनेक साकार करण्याची विचारशृंखला निर्माण होईल असा विश्वास वाटतो. हे पुस्तक सर्व वयोगटातील लोकांना नक्कीच आनंद देईल.

**कला-कृतिपर**

छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे

**किंमत ₹ १२०**

ऑनलाइन खरेदीसाठी

**jpprakashane.org**

# हस्तकलांचा उत्सव

**संपादन**
श्रुती जातेगावकर

**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०

# हस्तकलांचा उत्सव

(छात्र प्रबोधन मासिकात १९९५ ते २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या निवडक कलाकृतींचा या पुस्तकात समावेश केला आहे.)

◆ **प्रकाशक, मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
कार्यवाह
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०
mahendra.sethiya@jnanaprabodhini.org
© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

◆ **संपादन**
श्रुती जातेगावकर

◆ **मुखपृष्ठ व सजावट**
संदेश जोशी

◆ **अक्षर जुळणी**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

◆ **प्रथम आवृत्ती**
राष्ट्रीय सौर पौष शके १९३८, जानेवारी २०१७

◆ **द्वितीय आवृत्ती**
राष्ट्रीय सौर चैत्र शके १९४८, एप्रिल २०२६

◆ **ISBN : 978-93-49735-61-3**

◆ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे 30
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**
☎ - ०२०-२४२०७१७५/१०८

◆ **किंमत**
₹ १२०

*'Hastakalancha Utsav'*
*(Collection of Art and Craft Models)*

**(याशिवाय या विषयावरील 'कागदी हस्तकलेच्या दुनियेत', 'कलेच्या विश्वात' व 'त्रिमितीची किमया' ही ज्ञान प्रबोधिनी प्रकाशित पुस्तके अवश्य संग्रही ठेवावीत.)**

# प्रस्तावना...

कला आणि माणूस यांचे नाते आदिमकाळापासून आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी माणसाने नेहमीच कलेचा आधार घेतलेला आहे. आपल्या आजूबाजूला उपलब्ध असलेल्या वस्तूंचा कल्पकतेने वापर करून कौशल्यपूर्ण कलाकृती तयार करणे हा अगदी अश्मयुगातील मानवापासून चालत आलेला वारसा आहे. आजही इतके शोध लागलेत, इतकी साधने आजूबााजूला उपलब्ध आहेत, तरीही टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करण्यातील माणसाची कल्पकता वाखाणण्याजोगीच आहे.

सतत नावीन्याचा शोध व सौंदर्यदृष्टी यातून त्याच-त्याच साधन साहित्यांतून प्रत्येक वेळी वेगळ्याच वस्तू तयार होतात. लिखाणासाठी उपयोगी म्हणून निर्माण झालेल्या कागदाने तर आपले संपूर्ण कलाविश्वच भारून टाकले आहे. कागदातून विविध वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती तयार करणे यासारखा आनंद नाही. बरं, या कागदाला कसाही वापरा, लगदा करा, तुकड्या-तुकड्यांनी जोडा, घड्या घाला, कापा, गुंडाळ्या करा, रंगवा...प्रत्येक वेळेस नवीनच कलाकृती जन्म घेते व आपल्याला स्तिमित करते. कधीकधी तर काही वस्तू कागदापासून बनवलेल्या आहेत यावर विश्वास ठेवणे कठीण जाते. अशाच काही कलाकृती, ज्या 'छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीच्या मासिकातून या अगोदर प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांचे संकलित स्वरूप 'हस्तकलांचा उत्सव' या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आलेल्या आहेत.

या पुस्तकातील कलाकृतींचे कागदकाम व ओरिगामी, आकाशकंदील, सुशोभन, शुभेच्छापत्र व भेटवस्तू, संकीर्ण अशा पाच विभागांत वर्गीकरण केलेले आहे. वरवर सोप्या वाटणाऱ्या या कलाकृती करतांना मनाची एकाग्रता, अचूकपणा, सुबकता यांचा कस लागतो. भौमितिक आधार घेऊन कलाकृती करतांना एक मिलीमीटरचीही चूक असून चालत नाही. चूक असल्यास परत-परत मोजून, संयमाने व चिकाटीने चूक सुधारावी लागते. सुबकतेने तयार केलेली कलाकृती खूपच आनंद देऊन जाते.

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत नवनिर्मिती क्षमता विकसनाला खूप महत्त्व आहे. हस्तकौशल्य हा सर्वांचाच आवडता विषय. त्यात सृजनाला भरपूर वाव! एक कलाकृती बनवल्यावर त्याच साहित्यातून दुसरी कलाकृती सुचायला लागावी; थोडे साहित्य बदलून-वाढवून नवनवीन कलाकृती बनवता याव्यात. यासाठी या पुस्तकाचा नक्कीच उपयोग होईल हा विश्वास आहे.

– अपर्णा म्हात्रे

# मनोगत

पुस्तकाचे संपादन करण्याची ही माझी पहिलीच वेळ! ‘पुस्तकाचे संपादन करणे म्हणजे नक्की काय?’ हे माहीत नसताना नवीन अनुभव घेण्याची ही संधी मी स्वीकारली. हे पुस्तक वेगवेगळ्या कलाकृतींशी निगडित असल्याने माझे काम अजूनच interesting असणार होते. लहानपणापासून छात्र प्रबोधनची वाचक असल्याने त्याच विभागात काम करणे exciting होते. हा पूर्णच प्रवास अतिशय अविस्मरणीय होता.

या पुस्तकातील सर्व कलाकृती आधीच्या छात्र प्रबोधन अंकामधून प्रकाशित झालेल्या विविध कलाकृतींमधून निवडायच्या होत्या. या सगळ्या कलाकृतींतून काहीच कलाकृती निवडणे हे अतिशय अवघड गेले. सर्व कलाकृती फारच नावीन्यपूर्ण व आकर्षक होत्या; पण निकष ठरवतांना त्यातल्या त्यात आजच्या पिढीला आवडतील व रुचतील अशा सृजनाला वाव देणाऱ्या, ज्याचे सामान सहज उपलब्ध होईल अशा कलाकृती निवडायचे ठरवले.

सर्व कलाकृतींची निश्चिती झाल्यावर पाच गटांमध्ये त्यांची विभागणी केली. कागदकाम व ओरिगामी, आकाशकंदील, सुशोभन, शुभेच्छापत्रे व भेटवस्तू आणि संकीर्ण.

वरील वर्गांमध्ये विभागणी केल्यावर त्यांचा क्रम लावणे व त्याच्यानुसार पानक्रमांक देणे हे काम होते. संबंधित वाचकाला किंवा इच्छुक व्यक्तीला त्या-त्या विभागाच्या खाली विशिष्ट कलाकृती सहजतेने सापडायला हवी, हा त्यामागे विचार होता.

या सर्व प्रक्रियेच्या शेवटी एक समाधानकारक अनुक्रमणिका तयार करण्यात यश आले. येथे माझे काम संपत आले होते. यापुढील काम छात्र प्रबोधनमधील कार्यक्षम सदस्यांचे होते. लेखकांकडून संमती मिळवणे, पुस्तकाची मांडणी करणे, छपाई इत्यादी.

पुस्तक तयार होतानाचा हा प्रवास अतिशय विलक्षण होता. मुळातच कलाकृतींची आवड असल्याने नवीन-नवीन वस्तू तयार करण्यासाठी इतर रसिकांना प्रेरित करणारे हे पुस्तक संपादित करणे माझ्यासाठी आनंददायी प्रवास होता. मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. पुस्तक वाचताना त्यामागील अनेक लोकांनी घेतलेले कष्ट आपल्याला कदाचित जाणवत नाहीत; परंतु असा अनुभव घेतल्याने फक्त पुस्तकाच्या मजकुराबद्दलच नाही तर त्यामागील सर्वच प्रक्रियेबद्दल आदर अधिक वाढला.

ही unique संधी मला दिल्याबद्दल संपादक श्री. महेन्द्रभाई सेठिया यांची मी आभारी आहे. त्यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन अनमोल होते. त्याचबरोबर मीनलताई रंजनकर, शोभनाताई साठे व वर्षाताई कुलकर्णी व छात्र प्रबोधन परिवार यांचे त्यांनी केलेल्या मदतीसाठी व त्यांच्या आधारासाठी मनापासून आभार मानते.

– श्रुती जातेगावकर

# अंतरंग


➢ **कागदकाम व ओरिगामी** ........................ ७
- कागदाची किमया — दि. दा. जोशी ........... ८
- पंख्याच्या घडीपासून कलाकृती — हेमा धोत्रे .............. ९
- जादूचा फोल्डर — श्रीरंग गोखले ..........१०
- लेटर रॅक — चंद्रशेखर हडप ........१२
- अनोखी लॅम्पशेड — श्रीरंग गोखले...........१४
- लॅम्पशेड — रोहित कोकीळ.........१७
- कागदी परडी — जोत्स्ना सुतवणी........१९
- रद्दी कागदापासून कलावस्तू — हेमा धोत्रे...............२१
- आकर्षक वस्तू — रेखा जोशी .............२३
- टिश्यू पेपरची फुले — हेमा धोत्रे...............२५
- ट्रेसिंग पेपरची फुले — अपर्णा म्हात्रे ...........२६
- ड्युप्लेक्स कागदाचा गुलाब — शशिकला सुराणा.......२७
- फुलदाणी — रोहित कोकीळ.........२९
- कागदाच्या लगद्याच्या बाहुल्या — मेधा सुदुंबरेकर .........३१
- बोलक्या बाहुल्या — अनिल गुरव............३३
- क्विलिंग — सुषमा भालेराव.........३५
- कागदाचे स्टूल — श्रीरंग गोखले...........३९
- चित्राला ‘तिसरी मिती’ द्या — सतीश देशपांडे .........४१
- चला किल्ला करू या! — मृदुला गोखले..........४३
- कागदाचा पेंग्विन — तुकाराम पाटील ........४६

➢ **आकाशकंदील** ........................ ४७
- आगळावेगळा आकाशकंदील — रोहित कोकीळ.........४८
- कागदी द्रोणांचा आकाशकंदील — अपर्णा म्हात्रे ...........५०
- पंचकोनी आकाशकंदील — डॉ. द. वि. नवाथे .....५१
- आकर्षक आकाशकंदील — अभिजित घोडके .......५३
- घडीचा आकाशकंदील — जयंत टोले .............५५
- घरच्याघरी आकाशकंदील — डॉ. द. वि. नवाथे .....५८
- आकाशकंदील — रोहित कोकीळ.........६०
- कापडी आकाशकंदील — जयंत टोले .............६२
- सहज सोपा आकाशकंदील — सतीश देशपांडे .........६४

♦ लॅम्पशेड रोहित कोकीळ.........६६
♦ आगळावेगळा त्रिमित आकाशकंदील हेमा धोत्रे...............६८

➢ **सुशोभन** ......................... ७०
♦ श्रीगजाननाची आरास हेमा धोत्रे...............७१
♦ क्रेप कागदाचा हार अपर्णा म्हात्रे ...........७२
♦ चौफुला सुशोभन जयश्री मांडके ..........७३
♦ वॉल हँगिंग संगीता केळकर.........७४
♦ त्रिमिती रचनाचित्र सतीश देशपांडे .........७५
♦ हलतं झुलतं शिल्प जयंत टोले .............७६
♦ कागदी पंखा संगीता केळकर.........७८
♦ पत्त्यांची फोटोफ्रेम हेमा धोत्रे...............८०
♦ पेपर स्ट्रॉची फोटोफ्रेम श्रद्धा मुथा..............८२
♦ कागदी म्युरल मेधा सुदुंबरेकर .........८३
♦ मक्याच्या कणसाच्या आवरणाची फुले अपर्णा म्हात्रे............८४

➢ **भेटवस्तू व शुभेच्छापत्रे** ......................... ८६
♦ बनवूया भेटवस्तू - ब्रूच मेधा सुदुंबरेकर .........८७
♦ फोटोफ्रेम मेधा सुदुंबरेकर .........८८
♦ कॉफी पेंटिंग प्रतिमा मेंढे .............८९
♦ घरीच बनवा उठावदार फ्रेम चंद्रशेखर हडप .........९१
♦ झेपावणारे फुलपाखरू मृदुला गोखले ..........९४
♦ कोलाज शुभेच्छापत्रे सुजाता देवकुळे ........९६
♦ त्रिमितीयुक्त आकर्षक शुभेच्छापत्रे महेंद्र सेठिया ...........९७

➢ **संकीर्ण** ......................... ९९
♦ रॉक ॲण्ड पेपर स्कल्प्चर शुभा रुद्र .............१००
♦ शोभेचा कागद संकलन ..............१०१
♦ घरच्या घरी शोभेचा कागद मेधा सुदुंबरेकर .......१०२
♦ गोटी उंदीर उल्हास टुमणे.........१०३
♦ 'एक से भले दो' रोहित कोकीळ.......१०४
♦ शिडाचे जहाज गिरीश थोरात.........१०६
♦ पतंगाचे विमान माधव खरे ...........१०८
♦ शाडू मातीचा पेनस्टॅण्ड संजय बुगुटे...........१११
♦ आगपेटीच्या काड्यांची वाद्ये अक्षय बोर्डे...........११२